## निवडक



शिर्डी : श्री साई परिक्रमामध्ये सेवक रूपाने सहभागी उजवीकडे मोहित चोपडेकर, डावीकडे रुकेश हरमलकर व इतर.

### गोव्यातील युवक झाले शिर्डीत सेवक

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. १५ : शिर्डी येथे झालेल्या श्री साई परिक्रमा कार्यक्रमात सडये शिवोली येथील मोहित चोपडेकर व रुकेश हरमलकर यांना सेवक होण्याचा मान मिळाला. जवळपास चौदा किलोमीटर लांब परिक्रमेत लाखो भाविकांचा सहभाग होता. सेवक होण्याचा मान निवडक भाविकांना देण्यात आला होता. यामध्ये या दोन सेवकांचा समावेश होता. याबाबत मोहित चोपडेकर यांनी माहिती दिली. ते म्हणाले पहाटे ५.३० वाजता साई परिक्रमाची सुरुवात झाली. जवळपास चौदा किलोमीटर व सात तास पायी प्रवास करून दुपारपर्यंत सर्व भाविक पुन्हा मंदिरात पोहोचले. सेवक होण्याचा सन्मान केल्याबद्दल दोन्ही युवकांनी आयोजकांचे आभार मानले.गेल्या वर्षी सुद्धा या दोन्ही युवकांना हा सन्मान मिळाला होता.

---



डिचोली : संत रोहीदास जयंती कार्यक्रमात सहभागी गोकुळ दास हरमलकर. बाजूस सत्कारमूर्ती बाबुराव हरमलकर, सुलोचना हलर्णकर व इतर.

### डिचोलीत संत रोहिदास यांची जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १५ : संत रोहिदास समाज सांस्कृतिक क्रीडा नाट्य मंडळ डिचोलीच्यावतीने संत रोहिदास यांची जयंती बोर्डे डिचोली येथे रामचंद्र हळणकर यांच्या निवासस्थानी बुधवारी साजरी करण्यात आली. कार्यक्रमास मुख्य अतिथी या नात्याने सामाजिक कार्यकर्ते गोकुळदास हरमलकर उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते संत रोहिदास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्याम मोरगावकर यांनी स्वागत केले. समाजाच्या कार्याला हातभार लावणाऱ्या बाबुराव हरमलकर तसेच सुलोचना हलर्नकरं यांचा सत्कार करण्यात आला. माजी अध्यक्ष श्रीधर मयेकर यांनी प्रार्थना केली सचिव प्रशांत हलर्णकर यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला वेणूनाथ हलर्नकरं व इतर सभासद उपस्थित होते.

---

### बेतोडा येथील सत्पुरुष देवस्थानात आज शुद्धीकरण विधी

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १५** : श्री सत्पुरुष देवस्थान ट्रस्ट मिनेझिस बस्तोडा येथे रविवार दि. १६ रोजी सकाळी शुद्धीकरण विधी यजमान अस्मिता पेडणेकर त्यानंतर शिवशंकर आनंद मयेकर व वनिता मयेकर यांनी स्वखर्चाने श्री सद्गुरूंच्या देवस्थान सभागृहाचे बांधकाम करून दिलेल्या नूतन सभागृहचे उद्घाटन प्रख्यात ज्योतिषी चिंतामणी केळकर यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यात डॉ. सोहनी शिवशंकर मयेकर, श्रुती मयेकर तसे देवस्थान समिती देवस्थान महाजन भावीक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितत नाम फलकाच अनावरण करण्यात येईल. संध्याकाळी ७ वाजता भजनाचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार दि. १७ रोजी श्री सत्पुरुष देवाचा सातवा वर्धापन दिनाचा सोहळा यजमान लालन दिलीप कारापुरकर यांच्या हस्ते सकाळी धार्मिक विधी रातो ८ वाजता श्रींची पालखीतून मिरवणूक मंगळवार दि. १८ रोजी सकाळी धार्मिक विधी यजमान शितल तळकर यांच्या हस्ते सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद संध्याकाळी ६ वाजता भजन कलाकारांचे भजन ९ वाजता नाटक रायगडला जेव्हा जाग येते. बुधवार दि. १९ रोजी सकाळी धार्मिक विधी अश्विन साळगावकर यांच्या हस्ते सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसाद संध्याकाळी ६ वाजता मजनी कलाकारांचे भजन व रात्र ९ वाजता मिनेझिस वाडा बस्तोडा सादर करणार आहे. नाटक मोग म्हजो तुझो गुरुवार दि. २० रोजी सकाळी धार्मिक विधी यजमान कविता काशिनाथ मुळगावकर नंतर महाप्रसाद संध्याकाळी सत्पुरुष महिला मंडळ मिनेझिस वाडा बस्तोडा सादर नाटक 'आंगशो मांगशो' होईलय

---

### श्लोक पठण, अनुलेखन स्पर्धेत कोरगाव सरकारी विद्यालयाच्या मुलींचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १५** : शाळा समूहाच्या अंतर्गत घेतलेल्या श्लोक पठण आणि अनुलेखन स्पर्धेत सरकारी प्राथमिक विद्यालय भटवाडी कोरगावच्या शाळेच्या मुलांनी यश संपादन केले. या स्पर्धेत सरकारी प्राथमिक विद्यालय भटवाडी कोरगाव व कमलेश्वर प्राथमिक शाळा देऊळवाडा कोरगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. पहिली व दुसरी या गटासाठी श्लोक पठन स्पर्धेत सरकारी प्राथमिक विद्यालय भटवाडी शाळेतील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी वीरांगी वामन गावडे हिला प्रथम बक्षीस इयत्ता दुसरीचा विद्यार्थी अथर्व अमर नरसे याला द्वितीय बक्षीस तर इयत्ता पहिलीचा विद्यार्थी कल्पेश सर्वेश थळी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. तर अनुलेखन स्पर्धा ही इयत्ता तिसरी व चौथीच्या गटासाठी आयोजित केली होती. या स्पर्धेत सरकार प्राथमिक विद्यालय भटवाडी शाळेतील इयत्ता चौथीचे विद्यार्थ्यांनी त्रिशा नरसे हिला प्रथम बक्षीस इयत्ता चौथीची विद्यार्थी रिषभ गावडे याला दूसरे बक्षीस तर दक्ष मांद्रेकर इयत्ता तिसरी याला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रद्धा गणपुले लाभला होत्या परीक्षकाचे स्वागत शिक्षिका ज्योसना नानोसकर यांनी केले तर आभार प्रदर्शन योगिता गावडे यांनी केली स्पर्धेच्या वेळी कमलेश हायस्कूलच्या शिक्षिका पूनम नाईक व गोसावी उपस्थित होत्या.

---

### केरी - फोंडा येथील बेताळ मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १५** : केरी – फोंडा येथील श्री बेताळ मंदिर सवास्तू पुन:प्रतिष्ठापनेचा दहावा वर्धापनदिन सोहळा व वार्षिक गंधपूजा उत्सवानिमित्त श्री शांतादुर्गा (सातेरी) देवालय सेवा समिती केरी व कला आणि संस्कृती संचालनालय गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर नाट्यमहोत्सव येत्या रविवार दि. १६ ते गुरुवार दि. २० रोजीपर्यंत होणार आहे. यानिमित्त रविवारी दि. १६ रोजी वर्धापनदिनानिमित्त दुपारी महाप्रसाद, रात्री ९ वाजता उद्घाटन सोहळा , व त्यानंतर १० वाजता विठ्ठल नाईक प्रस्तुत, 'हॅलो बाबा' हा कोंकणी नाट्यप्रयोग होईल. सोमवारी दि. १७ रोजी वार्षिक गंधपूजा उत्सव, रात्री १० वाजता साई किरण महिला नाट्य मंडळ केरी प्रस्तुत 'भक्त प्रल्हाद' हा संगीत पौराणिक नाट्यप्रयोग होईल. मंगळवारी दि. १८ रोजी देवालय समितीतर्फे गंधपूजा, रात्री १० वाजता खामिणी कला मंडळ, पाली – सावईवेरे निर्मित 'शू कोण तरी आसा' हा कोंकणी नाट्यप्रयोग होईल. बुधवार दि. १९ रोजी समस्त नाईक पारपती कुटुंबीय यांच्यातर्फे गंधपूजा, रात्री १० वाजता श्री महालक्ष्मी गोठ्णेश्वर नाट्य मंडळ, केरी प्रस्तुत 'कुडडो मोग' हा नाट्यप्रयोग होईल. गुरुवार दि. २० रोजी समस्त गुरव व गाड कुटुंबीय तर्फे गंधपूजा, संध्याकाळी ६.३० वाजता हेमंत च्यारी व साथी यांचा भजनाचा कार्यक्रम, रात्री १० वाजता आरोलकर दशावतारी नाट्य मंडळ, आरवली – महाराष्ट्र प्रस्तुत पौराणिक दशावतारी नाटक होईल. तरी सर्व भाविकांनी व रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# न्यूझीलंचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

## ५ विकेट्सने पराभव | १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानला झटका

**इस्लामाबाद, दि. १५ :**

तिरंगी मालिकेतील अंतिम सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव केला आहे. पाकिस्तानच्या चार फलंदाजांना झटपट तंबूचा रस्ता दाखविणारा विल्यम ओ'रोर्क हा सामनावीर ठरला. त्याने चार बळी घेतले. १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन ट्रॉफीपूर्वी पाकिस्तान क्रिकेट संघाला घरच्या मैदानावर मोठा झटका बसला आहे.

चॅम्पियन ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानने दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यासमवेत तिरंगी मालिका खेळली. दक्षिण आफ्रिका संघ या मालिकेतून बाहेर पडला. पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्या अंतिम सामना झाला. पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पाकिस्तान संघाने शानदार फलंदाजी केली होती. पाकिस्तानची सुरुवात खूपच खराब झाली आणि फखर झमान फक्त १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. तर संघाचा स्टार फलंदाज बाबर आझम केवळ २९ धावांपर्यंतच मजल मारु शकला. संघाचे आघाडीचे तीन फलंदाज ५३ धावांवरच तंबूत परले.

अवघ्या २४२ धावांत पाकिस्तानचा डाव आटोपला

पाकिस्तान संघातसाठी




धक्कादायक बाब म्हणजे संपूर्ण संघ ५० षटकेही खेळू शकला नाही. आघाडीचे फलंदाज गारद झाल्यानंतर मधल्या फळीत मोहम्मद रिझवान आणि सलमान अली आगा यांनाही खेळपट्टीवर टिकाव धरता आला नाही. रिझवानने ४६ धावा केल्या तर गेल्या सामन्याचा हिरो सलमानने ४६ धावा केल्या. याशिवाय तय्यब ताहिरने ३३ चेंडूत ३८ धावा केल्या. एकामागून एक सर्व पाकिस्तानी फलंदाज बाद होत राहिले आणि संपूर्ण संघ फक्त २४२ धावांवर बाद झाला.

गोलंदाजही अपयशी, न्यूझीलंडने केली चांगलीच धुलाई

२४२ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या फलंदाजांनी पाकिस्तानच्या गोलंदाजांची चांगली धुलाई केली डेव्हॉन कॉनवे, केन विल्यमसन, डॅरिल मिशेल आणि टॉम लॅथम यांनी आश्वासन फलंदाजीचे प्रदर्शन केले. न्यूझीलंडकडून मिशेलने सर्वाधिक ५७ धावा केल्या. तर लॅथमने ५६ धावा केल्या. फलंदाजांपाठोपाठ पाकिस्तानच्या गोलंदाजांनीही अत्यंत खराब कामगिरीचे प्रदर्शन केले. न्यूझीलंडने ५ गडी राखत अवघ्या ४६ व्या षटकात विजय साजरा केला.

# टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी रवाना

मुंबई, दि. १५ :चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ही स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानच्या यजमानपदाखाली सुरू होणार आहे, ज्यासाठी ८ पैकी ७ संघ पाकिस्तानला पोहोचत आहेत, तर भारतीय संघ १५ फेब्रुवारी रोजी दुबईला रवाना झाला आहे, जिथे तो या स्पर्धेत आपले सामने खेळेल. टीम इंडिया मुंबई विमानतळावरुन दुबईला रवाना झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये विराट–रोहित आणि कोच गौतम गंभीर दिसत आहे.



भारताने आपल्या संघ खूप आधी जाहीर केला होता, ज्यामध्ये रवाना होण्यापूर्वी २ बदल दिसून आले. या स्पर्धेत रोहित शर्मा भारतीय संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत आहे, ज्यांच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने २०२४ मध्ये टी–२० विश्वचषक जिंकला होता. या महत्त्वाच्या स्पर्धेत टीम इंडियाला २० फेब्रुवारी रोजी बांगलादेश संघाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे. तेथील परिस्थिती लक्षात घेऊन, रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली दुबईला रवाना झालेल्या भारतीय संघात कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांच्यासह ५ फिरकीपटूंचा समावेश करण्यात आला आहे.

जेव्हा चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर झाला तेव्हा जसप्रीत बुमराहला त्यात स्थान मिळाले, परंतु तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला आणि त्याच्या जागी हर्षित राणाला संघात स्थान देण्यात आले आहे. याशिवाय, यशस्वी जैस्वालच्या जागी वरुण चक्रवर्तीला संघात स्थान देण्यात आले. या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी, भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली, ज्यामध्ये त्यांनी तिन्ही सामने जिंकण्यात यश मिळवले आणि यामध्ये कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही आपला फॉर्म परत मिळवण्यात यशस्वी झाले.

भारत २३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्ध भिडणार –

भारत आणि पाकिस्तानचे चाहते २३ रोजी होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची आतुरतेने वाट पाहत आहेत. या दिवशी टीम इंडिया दुबईच्या मैदानावर ग्रुप–ए मध्ये यजमान पाकिस्तानशी सामना करेल. टीम इंडियाचे सर्व सामने भारतीय वेळेनुसार दुपारी २.३० वाजता सुरू होतील.

### शाहीन आफ्रिदीसह पाकिस्तानच्या ३ खेळाडूंना शिक्षा; आयसीसी ची कठोर कारवाई

**इस्लामाबाद, दि. १५ :**

पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत यजमान संघाला मोठा धक्का बसला आहे. आयसीसीने आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल तीन पाकिस्तानी खेळाडूंवर कारवाई केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यादरम्यान वातावरण खूपच तापले होते. दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज मॅथ्यू ब्रीट्झकेशी टक्कर झाल्यानंतर शाहीन आफ्रिदी शाब्दिक बाचाबाचीत सामील झाला, तर सौद शकील आणि कामरान गुलाम अनावश्यकपणे टेम्बा बावुमासमोर आले आणि त्याला धावचीत केल्यानंतर उत्साह साजरा केला.

आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान खेळाडू, खेळाडू सहाय्यक कर्मचारी, पंच, सामनाधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी (प्रेक्षकासह) अनुचित शारीरिक संपर्क या संहितेच्या कलम २.१२ चे उल्लंघन केल्याबद्दल शाहीन शाह आफ्रिदीला त्याच्या सामन्याच्या शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला.

ही घटना दक्षिण आफ्रिकेच्या डावाच्या २८व्या षटकात घडली, जेव्हा शाहीनने जाणूनबुजून फलंदाज मॅथ्यू ब्रिट्झकेला एक धाव घेण्यापासून रोखले, ज्यामुळे शारीरिक संपर्क झाला आणि दोन्ही खेळाडूंमध्ये जोरदार वाद झाला. दुसरीकडे, २९ व्या षटकात टेम्बा बावुमा धावबाद झाल्यानंतर मैदानाजवळ खूप आनंद साजरा केल्याबद्दल सौद शकील आणि कामरान गुलाम यांना त्यांच्या सामन्याच्या फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला. दोन्ही खेळाडूंना संहितेच्या कलम २.५ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले,


### फोंड्यात २२ रोजी 'गीत सावरकर मैफिल'

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १५** : गोवा मराठी अकादमी फोंडा प्रभाग,सूर्या फाऊंडेशन गोवा आणि विद्या वृद्धी संस्था फोंडा यांच्या संयुक्त विद्यमाने जाज्वल्य देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या रचनावर आधारित गीत सावरकर या गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शिवजयंती, मराठी गौरव दिन आणि सावरकर पुण्यतिथी या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. २२ रोजी सायंकाळी ६ वाजचा वद्या वृद्धी संस्था शांतीनगर, कूडतरकर नगरी फोंडा येथे होत आहे.

गोव्यातील नामवंत गायक आणि संगीतकार अजय नाईक यांनी संगीत नियोजन केले असून यात अजय नाईक, अर्कज/ऊर्विजा नागवेकर, स्नेहल गुरव कारखानीस, प्राप्ती गावस, प्रिया नाईक आणि ईतर कलाकार भाग घेतील. संगीत साथ सुरेश घाडी, सुरजीत थळी, दामोदर नाईक आणि केतन साळगावकर करतील. कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन साहित्यिक आणि संगीतकार गो. रा. ढवळीकर तसेच गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत करतील या शिवाय या कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी साहित्यिक डॉ. बिभिषण सातपुते, गोवा मराठी अकादमीचे फोंडा प्रभाग अध्यक्ष नीलेश नाईक, विद्या वृद्धीचे अध्यक्ष उदय डांगी आणि सूर्या फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मस्के हजर राहतील. हा कार्यक्रम खुला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राधा गाड करणार असून उमेश गावणेकर, विनय बोरकर, हनुमंत नाईक, आसावरी भिडे, श्रद्धा शिरोडकर, निवेदनाची बाजू सांभाळतील, अशी माहीती प्रभाग सचिव प्रा. वरदा गाड केरकर व निर्माते प्रा. महेश नागवेकर यांनी दिली आहे.

### सुपरमाइंड बुद्धिबळ गोव्यातील नऊ विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मानांकन



पियुष देसाई | वेदंक भैरेली | प्रजय मालदार | तनिश तेंडोलकर | अन्वी देसाई | ईशा सावंत | विश्रम गावकर | वंश देसाइ | देवेंद्र शिरोडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १५** : काणकोण येथील अन्वी देसाई, ईशा सावंत, पियुष देसाई, विश्रम नाईक गांवकर, वंश देसाई, वेदंक भैरेली, दवेंद्र शिरीडकर, प्रजय मालदार, तनिश तेंडोलकर यांना आंतरराष्ट्रीय फिडे मानांकन नुकतेच मिळाले आहे.

अन्वी अभय देसाई आणि ईशा महादेव सावंत या चावडी, काणकोण येथील सेंट तेरेझा हायस्कूलच्या ७ वी आणि ८ वी इयत्तेत शिकत आहेत. अन्वीला मानक रेटिंग (१४७७) आणि वेगवान रेटिंग (१४६९) मिळाले आहे. ईशा सावंतला रॅपिड रेटिंग (१४८३)असे मिळाले आहे.

पियुष देसाई, वंश वल्लभ देसाई आणि वेदंक भैरेली हे निराकर विद्यालय माशेंचे आठवीतील विद्यार्थी आहेत. पियुष देसाईला जलद रेटिंग (१४५५) वंशाला मानक रेटिंग (१४४२) आणि रॅपिड रेटिंग (१४८३) मिळाले आहे.वेदंक भैरेलीला वेगवान रेटिंग मिळाले(१४३९) तर आगोंद येथील विश्रम किरण नाईक गांवकर यांना जलद मानांकन मिळाले आहे (१४४७). तो मडगांव येथील महिला आणि नूतन इंग्लिश शाळेत आठवी इयत्तेत शिकत आहे. दामोदर विद्यालय लोलयेंच्या आठव्या इयत्तेच्या विद्यार्थ्याने दवेंद्र शिरोडकरला रॅपिड रेटिंग (१४९०) मिळाले आहे. ऑनलाइन विद्यार्थी प्रजय मालदार याला मानक रेटिंग (१४९१) मिळाले. तो जी.एस. आमोणकर विद्यामंदिर म्हापसा येथे आठवीत शिकणारा विद्यार्थी आहे.

आणखी एक ऑनलाइन विद्यार्थी तनिश तेंडूलकरला जलद रेटिंग मिळाले(१४४९). तो घ.च.ड.झ मंडळ इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूल सिंधुदुर्गा, महाराष्ट्र, मधील ८वी इयत्तेत शिकत आहे. त्यांनी नुकतेच दुर्गा मोटर्स आंतरराष्ट्रीय रेटिंग, मस्टीफंड रेटिंग, आणि बेळगावी फिडेरेटिंग बुद्धिबळ स्पर्धा आणि गोवा आंतरराष्ट्रीय खुल्या ग्रँडमास्टर बुद्धिबळ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय रेटिंग कामगिरी पूर्ण केली आहे. हे सर्व काणकोण शेळेर येथील बुद्धीबळ तज्ञ सुधाकर पटगर, सुपरमाइंड चेस अकादमी काणकोण यांच्या अंतर्गत प्रशिक्षित आहेत. यामुळे या सर्वांचे या भागातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# झिम्बाब्वेचा आयर्लंडवर ४९ धावांनी विजय

## सामनावीर ब्रायन बेनेटच्या १६९ धावा : मुजराबानीने घेतल्या ४ विकेट्स

**हरारे, दि. १५ :**

पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेने आयर्लंडवर ४९ धावांनी विजय मिळवला. शुक्रवारी हरारे येथे आयर्लंडने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने ५ विकेट्स गमावून २९९ धावा केल्या. सामनावीर ब्रायन बेनेटने १६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, आयर्लंड संघ २५० धावांवर सर्वबाद झाला. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझाराबानीने ४ आणि रिचर्ड नगारावाने ३ विकेट घेतल्या. आयर्लंडच्या एकाही खेळाडूने अर्धशतक केले नाही. कर्टिस कॅम्फरने सर्वाधिक ४४ धावा केल्या. झिम्बाब्वेने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बेन करन आणि ब्रायन बेनेट यांनी ९५ धावांची भागीदारी केली. करण २८ धावा करून बाद झाला. कर्णधार क्रेग एर्विनने बेनेटसोबत १३६ धावांची भागीदारी केली. इर्विन ६६ धावा करून बाद झाला. ८–८ धावा काढल्यानंतर सिकंदर रझा



आणि वेस्ली मधवेरे पॅव्हेलियनमध्ये परतले.

५० व्या षटकात १६९ धावांवर बाद होण्यापूर्वी बेनेट एका टोकाला टिकून राहिला. त्याच्या खेळीच्या मदतीने संघाने ५ विकेट गमावल्यानंतर २९९ धावा केल्या. जोनाथन कॅम्पबेल ६ धावांवर आणि टी मुरुमनी २ धावांवर नाबाद राहिले. आयर्लंडकडून मार्क अदायरने २ विकेट घेतल्या. जोशुआ लिटल, ग्राहम ह्यूम आणि अँडी मॅकब्राइन यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

३०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंड संघाने पहिल्याच षटकात आपली विकेट गमावली. अँडी बालबर्नी खाते न उघडताच बाद झाला. कर्णधार पॉल स्टर्लिंगने ३२, कर्टिस कॅम्फरने ४४, हॅरी टेक्टरने ३९, लॉर्कन टकरने ३१, अँडी मॅकब्राइनने ३२ आणि जॉर्ज डॉकरेलने ३४ धावा केल्या.

६ आयर्लंड खेळाडूंची सुरुवात चांगली झाली, पण कोणीही मोठी धावसंख्या उभारू शकले नाही. शेवटी, ४६ धावा केल्यानंतर संघ २५० धावांवर ऑलआउट झाला. झिम्बाब्वेकडून वेस्ली मधवेरेने २ आणि सिकंदर रझाने १ विकेट घेतली.

**आज दुसरा एकदिवसीय सामना**

पहिला एकदिवसीय सामना जिंकून झिम्बाब्वेने ३ सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. दुसरा एकदिवसीय सामना १६ फेब्रुवारी रोजी हरारे येथे खेळला जाईल. मालिकेपूर्वी, आयर्लंडने एकमेव एकदिवसीय सामना ६३ धावांनी जिंकला होता. दोन्ही संघ ३ टी–२० सामन्यांची मालिका देखील खेळतील.



सडा : श्रीलक्ष्मी नारायण मंदिर समिती सदस्य अध्यक्ष प्रेमानंद केरकर, संदीप पालयेकर, सुवर्ण परब, सुरज शेटये, सुरज घोणसेकर, महादेव डिचोलकर, गिरिश कोळंबकर व कृष्णा केरकर.

### लक्ष्मीनारायण मंदिराच्या अध्यक्षपदी प्रेमानंद केरकर

■ टीम दैनिक हेराल्ड

वास्को, दि. १५ :हेडलॅन्ड सडा येथील श्रीइस्वटीब्राम्हण लक्ष्मीनारायण मंदिर समिती अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा प्रेमानंद लक्ष्मण केरकर हे २०२५ ते २०२८ कार्यकाळापर्यंत निवडून आलेले आहेत. उपाध्यक्ष श्री संदिप पालयेकर. सचिव श्री सुवर्ण र. परब. उपसचिव श्री सुरज म. शेटये तोरस्कर. खजिनदार सुरज स. घोणसेकर, सहखजिनदार महादेव डिचोलकर. मुखत्यार गिरिश र. कोळंबकर व उपमुखत्यार म्हणून कृष्णा केरकर यांची निवड करण्यात आली आहे. चौथ्यांदा श्रीचरणी सेवा करण्याचे भाग्य मिळाल्याबद्दल अध्यक्ष प्रेमानंद केरकर यानी यानी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत. हि निवडणूक रविवार दि. ९ रोजी सकाळी ९.३० पासून दुपारी १ पर्यंत श्रीलक्ष्मीनारायण सभागृहात सडा येथे घेण्यात आली होती.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 164 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .